लोकसत्ता

# कातकरी कुटुंबांना अन्नधान्य

फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाउंडेशनतर्फे वनवासी कल्याण आश्रमाच्या सहकार्याने मावळ, भोर, वेल्हा, खेड, जुन्नर आणि आंबेगाव या तालुक्यांतील आदिवासी कातकरी समाजातील अडीच हजार कुटुंबांना अन्नधान्य वाटप करण्यात आले. फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे उपाध्यक्ष बी. आर. मेहता, वनवासी कल्याण आश्रमाचे मनोज पोचत, दिलीप मेहता, प्रकाश किचडे, विनायक खाडे, महेश भुस्कुटे, मिलिंद करमरकर, सुरेश हणमंते, सुनील भोसले, जितेंद्र जाधव या वेळी उपस्थित होते. फाउंडेशनच्या अध्यक्षा रितू छाब्रिया म्हणाल्या, रानावनातील मेवा गोळा करून त्यावर उदरनिर्वाह करणाऱ्या कातकरी समाजाची अडचण वनवासी कल्याण आश्रमाने मांडली. डोंगराळ भागात राहणाऱ्या या समाजाला मदतीचा हात देताना आनंद वाटतो.